**CNR No.MHST120005962022**

**नियमित दिवाणी दावा क्र.–२०८/२०२२ मधील नि.२० ते २२ वरील आदेश एकत्रीतरित्या**

**१.** वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा मयत प्रतिवादी क्र.१ मारूती जगू तोरणे यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून त्यांचे विरूध्द पारित झालेला उपशमनाचा आदेश रद्दबातल करून त्यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरूध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातीत प्रतिवादी क्र.१ मारूती जगू तोरणे हे दि.०३.१०.२०२२ रोजी मयत झाले आहेत. वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ हे दावा प्रलंबित असताना मयत झाले आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर येणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ चे वारस हे प्रस्तुत दाव्याचे कामी वादी व प्रतिवादी क्र.२ व ३ हे आहेत व त्यांना दाव्याचे कामी समाविष्ट करणे गरजेचे आहे. म्हणून वादी यांनी प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल करून अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे व कथन केले आहे की, योग्य तो आदेश पारित करण्यात यावा.

४. वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस. डी. सातपुते व प्रतिवादींतर्फे श्री. एस. बी. कोळकर विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद मजकूराप्रमाणे युक्तीवाद केला. वर नमूद संपूर्ण बाबींचा व संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, यातील मयत प्रतिवादी क्र.१ मारूती जगू तोरणे हे दि.०३.१०.२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र.१ याचे नावापुढे मयत असे दर्शविणे योग्य व न्यायोचित होणार आहे. याठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, मयत प्रतिवादी क्र.१ यांना प्रस्तुत दाव्यातील वादी व प्रतिवादी क्र.२ व ३ हेच वारस असून त्यांना इतर कोणीही वारस नाहीत. मात्र प्रतिवादी क्र.१ चे वारस घेणेस वादी यांना विलंब झालेला आहे. एकंदरीत अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांचा विचार करता वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला असल्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे निराकरण होणेसाठी मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेतल्यास दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही तर न्यायनिवाडा करणेस मदतच होणार आहे. वर नमूद सर्व बाबींचा व संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, प्रस्तुतचे अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या अंतिम निकालावर निर्माण होणा–या उभयपक्षकारांतील वादप्रश्नांचे निरसन होण्यास मदत होईल. सबब वरील सर्व बाबींचा विचार केला असता मला खालील आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते.

# आदेश

१. वादीचा नि.२० ते २२ वरील अर्ज मंजूर करण्यात येतात.

२. वादीने निशाणी २२ प्रमाणे, प्रतिवादी क्र.१ याच्या नावापुढे सरनाम्यात मयत असे दर्शवून त्यानंतर त्यांचे वारस म्हणून वादी व प्रतिवादी क्र.२ व ३ यांना सामील करावे तशी दुरूस्ती करून आजपासून १४ दिवसांचे आत अभिलेखावर आणावे व दाव्याची दुरुस्ती प्रत द्यावी.

३. संबंधित लिपिकाने या दुरुस्तीच नोंद या दाव्याचे रजिस्टरला करावी.

( न्यायासनावरुन खुल्या न्यायालयात घोषित केले. )

Rajiv Babasaheb Bahirwal

Digitally signed by Rajiv Babasaheb Bahirwal
Date: 2023.06.16 17:12:27 +0530

म्हसवड. **( रा.बा.बहिरवाल )**

दि.१६.०६.२०२३ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,म्हसवड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | J.A. Patel, Stenographer (Grade-3) |
| Name of Court | R. B. Bahirwal, Civil Judge, Jr. Div, Mhaswad. |
| Date of Dictation | 16.06.2023 |
| Order signed by the P.O. on | 16.06.2023 |
| Order uploaded on | 16.06.2023 |